# यशोगाथा

## बिस्कीटांनी त्यांना बनविले उद्योजक



| | | |
|---|---|---|
| उद्योजकाचे नांव | : | जयश्री पाटील व उर्मिला पाटील |
| उद्योग | : | बिस्कीट निर्मीती |
| स्थापना | : | २०१७ |
| ब्रँडचे नांव | : | श्री नरसिंह घरगुती बिस्कीट |
| पत्ता | : | मौजे सांगाव, ता. कागल, जि. कोल्हापूर. |
| संपर्क | : | 9623934866 |

श्रीमती. जयश्री पाटील आणि उर्मिला पाटील यांनी उद्योजिका म्हणून २०१७ मध्ये महाराष्ट्रातील मौजे सांगाव, ता. कागल, जि. कोल्हापूर येथील गावात बिस्कीट बनविण्याचे युनिट सुरु केले. त्यांच्याकडे ४ एकर जमीन असुन ते बहुतेक पध्दतीने शेती करतात. वर्षभर ऊस आणि त्यामध्ये आंतरपिक म्हणून भाजीपाला पिकवतात. त्यांना शेतीशिवाय अन्नप्रक्रिया उद्योगमध्ये नवीन काहीतरी करायचे होते, म्हणून अधिक उत्पादन मिळवण्यासाठी आणि त्यांच्या कुटुंबाला आर्थिक पाठबळ देण्यासाठी बिस्कीटांचा उद्योग सुरु केला. सुरुवातीला त्यांनी कुटुंबाच्या आर्थिक मदतीने ओव्हन आणि मिक्सर अशी विविध उपकरणे खरेदी केली. त्यांनी आपल्या कुटुंबाकडून घेतलेले लोन २ वर्षांत आपल्या उद्योगाच्या माध्यमातुन परत केले. त्यामुळे त्यांना कुटुंबाने व्यवसाय करण्यास पूर्ण स्वातंत्र्य दिले आणि महिलांना आर्थिक आधार म्हणून त्यांचा उद्योग उदयास आला. त्यांनी विविध प्रशिक्षण घेतले. आणि बिस्कीट बनवण्याचे युनिट सुरु केले त्यांनी उत्पादनात श्री नरसिंह घरगुती बिस्कीट असे नाव दिले. बिस्कीट दुरध्वनीवरुन आणि घरगुती थेट विक्रीसाठी पुरवण्यात आले आणि त्यांच्या होम डिलीव्हरी सुविधा देखील उपलब्ध आहे.

### बिस्कीटांचे विविध प्रकार

सध्या बाजारात कोणत्या प्रकारच्या बिस्कीटांना मागण्या आहेत, त्यानुसार ते बिस्कीटे तयार करतात. त्यामध्ये गव्हाची बिस्कीटे, अमेरिकन कुकीज, नारळ बिस्कीट, चॉकलेट गुजबेरी, नाईक नानकटाई, काजू बिस्कीट अश्या विविध प्रकारची बिस्कीटे बनवतात. तसेच वेगवेगळया प्रकारची उपवासाची बिस्कीट बनवतात. ही बिस्कीटे राजगिरा आणि शाबूच्या पीठापासून बनवतात.

### बिस्कीट अर्थशास्त्र

गव्हाचे बिस्कीट १२० रु. किलो, इतर बिस्कीट १४० रु. किलो व उपवासाची बिस्कीटे २४० रु. किलोने विकली जातात. मागणीनुसार आठवड्यातून २०० किलो बिस्कीटांचे उत्पादन करतात. २०१७-१८ मध्ये ३७५०० रु. निव्वळ नफा झाला. २०१९-२० मध्ये त्यांनी ४२०० किलो बिस्कीटे तयार केली व त्यातुन त्यांना १५७००० रु. निव्वळ नफा झाला.

### योजना

भविष्यात ब्रेड, टोस्ट आणि उत्पादने मार्केटमध्ये आणण्याचे नियोजन करत आहेत.




